# पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे कार्यालय

**-: प्रेस नोट :-** दिनांक - २०/०४/२०२४

**अंमली पदार्थ विरोधी कक्षाने विविध ठिकाणी छापे टाकत ०४ आंतरराज्यीय हेरॉईन ड्रग्ज तस्करांसह ०७ ड्रग्ज तस्करांना अटक करून १ कोटी ३६ लाख रूपये किंमतीचे हेरॉईन व एम.डी. ड्रग्ज जप्त.**

| | |
|---|---|
| **अं.प.वि., गु.र.क्र. व कलम** | १) गु.र.क्र.२३/२०२४, कलम ८ (क) सह २१ (क), २९ एन.डी.पी.एस.कायदा १९८५ (**कांदिवली युनिट**)<br>२) गु.र.क्र.२४/२०२४, कलम ८ (क) सह २२ (क), २९ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ (**वरळी युनिट**) |
| **दाखल दिनांक** | दिनांक २०/०४/२०२४ |
| **गुन्हयांचे घटनास्थळ** | १) मालाड पश्चिम, मुंबई व विरार, वसई<br>२) कुर्ला पश्चिम, मुंबई |
| **आरोपी संख्या** | एकूण ०७ आरोपी. |
| **जप्त मुद्देमाल व अंदाजे किंमत** | १) एकुण ३१० ग्रॅम वजनाचा हेरॉईन अं.किं. रूपये १,२४,००,०००/-<br>२) एकुण ६० ग्रॅम वजनाचा एम.डी. (मेफेड्रॉन) अं.किं. रूपये १२,००,०००/-<br>**असा एकूण ३७० ग्रॅम वजनाचा व किंमत अंदाजे रू.१ कोटी ३६ लाख किंमतीचे हेरॉईन व एम.डी. अंमली पदार्थ जप्त.** |

(१) **मालाड पश्चिम, मुंबई व वसई विरार परिसरातून ३१० ग्रॅम हेरॉईन जप्त.** -

अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे **कांदिवली युनिटचे** पथकाने दिनांक १९/०४/२०२४ रोजी मालाड पश्चिम, मुंबई तसेच वसई विरोर या परिसरात अंमली पदार्थ विरोधी कारवाई करत एकूण ४ इसमास अटक केले. त्यांचे ताब्यातून **३१० ग्रॅम वजनाचा हेरॉईन एकुण किं.अं. रुपये १ कोटी २४ लाख रूपये** किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला. नमूद अटक आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. अटक आरोपीस मा.न्यायालया समक्ष रिमांडकामी हजर करीत आहे. नमूद गुन्हयाचा पुढील तपास कांदिवली युनिटचे पोउनि निखिल शेळके हे करत आहे.

(२) **कुर्ला पश्चिम, मुंबई परिसरातून ६० ग्रॅम एम.डी. जप्त** -

अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे **वरळी युनिटचे** पथकाने दिनांक २०/०४/२०२४ रोजी कुर्ला पश्चिम, मुंबई या परिसरात अंमली पदार्थ विरोधी कारवाई करत एकूण तीन इसमांस अटक केले. त्यांचे ताब्यातून **६० ग्रॅम वजनाचा 'मेफेड्रॉन' एकुण किं.अं. रुपये १२ लाख रूपये** किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला. नमूद अटक आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. अटक आरोपीस मा.न्यायालया समक्ष रिमांडकामी हजर करीत आहे. गुन्हयाचा पुढील तपास वरळी युनिटचे पोउनि अमित घोगरे हे करत आहे.

**अंमली पदार्थ विरोधी कक्षाने सन २०२४ मध्ये एकूण २४ गुन्हे दाखल करून त्यामध्ये एकूण ६२ आरोपींना अटक करत त्यांचे ताब्यातून एकूण ३४.५ किलो पेक्षा अधिक वजनाचे विविध अंमली पदार्थ व १२०० कोडेन मिश्रीत कफ सिरप बॉटल्स असा एकूण अं.किं.रूपये ३१.६४ कोटी पेक्षा अधिक किंमतीचे अंमली पदार्थ जप्त केला आहे.**

**सन २०२४ मध्ये हेरॉईन हा अंमली पदार्थ जप्तीचेएकूण ३ गुन्हे दाखल करून त्यामध्ये ८ आरोपींना अटक केले असून, त्यांचे ताब्यातून एकूण १ किलो १३८ ग्रॅम वजनाचा किं.अं.रुपये ४.२२ कोटी किंमतीचा हेरॉईन हा अंमली पदार्थ जप्त केला आहे. तसेच मेफेड्रॉन हा अंमली पदार्थ जप्तीचे एकूण १६ गुन्हे दाखल करून त्यामध्ये ४६ आरोपींना अटक केले असून, त्यांचे ताब्यातून एकूण ११.५ किलो पेक्षा अधिक वजनाचा किं.अं. रुपये २२.९२ कोटी किंमतीचा मेफेड्रॉन हा अंमली पदार्थ जप्त केला आहे.**

सदरची यशस्वी कामगिरी ही श्री. विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. देवेन भारती, विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री.लखमी गौतम, पोलीस सह आयुक्त(गुन्हे), श्री. शशि कुमार मीना, अपर पोलीस आयुक्त(गुन्हे), श्री. शाम घुगे, पोलीस उप आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई, व श्री. राजेंद्र शिरतोडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली अं.प.वि.कक्ष, गुन्हे शाखा, कांदिवली युनिटचे प्रभारी पो.नि. वैभव धुमाळ व वरळी युनिटचे प्रभारी पो.नि. श्री.संदिप काळे, यांचे नेतृत्वाखाली करण्यात आली आहे.

------oooo------